अत्यंत महत्वाचे व तातडीचे


## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

(परीक्षा व मूल्यमापन विभाग)

ई–मेल: coe@nagpuruniversity.nic.in


क्रमांक: रातुमनावि/पमूवि/२०/५७
दिनांक : १३ एप्रिल २०२०

प्रति,

१. विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य
३. मुख्य परीक्षा पर्यवेक्षक, उन्हाळी परीक्षा–२०२०, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. मूल्यांकन केंद्र प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. जिल्हा संकलन केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय: राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२० च्या परीक्षा पुढे ढकलण्याबाबत.**

संदर्भ: १.विद्यापीठाचे १६ मार्च २०२० रोजीचे परिपत्रक क्रमांक रातुमनावि/साप्र/२०/स/२९२१.
२. विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/पमूवि/२०/४५, दिनांक १६ मार्च २०२०.
३. भारत सरकारच्या गृहविभागाचे पत्र क्रमांक ४०–३/२०२०-DM-1(A), दिनांक २४ मार्च २०२०.
४. महाराष्ट्र शासनाच्या महसूल, वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे पत्र क्रमांक DMU/२०२०/ CR.92/DisM-1, दिनांक २५ मार्च २०२०.
५. विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/२०/स/२९२७, दिनांक २८ मार्च २०२०.
६. विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/पमूवि/२०/५१, दिनांक २८ मार्च २०२०.
७. महाराष्ट्र शासनाच्या Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai द्वारे निर्गमित अधिसूचना क्रमांक DMU/2020/C-92/DisM-I, dated 13th April.
८. विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/२०/स/२९३४, दिनांक १३ एप्रिल २०२०.

महोदय/महोदया,

केंद्र शासन, राज्य शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे सर्व शैक्षणिक विभाग, संचालित व संलग्नित महाविद्यालये आणि सर्व प्रशासकीय कार्यालयांना कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने संदर्भिय पत्र ६ नुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे दि. १७/०३/२०२० पासून दि. १४/०४/२०२० पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या सर्व लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे सर्व संबंधितांना कळविण्यात आले होते. आता शासनाच्या संदर्भिय पत्र क्रमांक ७ ला आणि विद्यापीठाच्या संदर्भिय क्रमांक ८ वरील परिपत्रकाला अनुसरून मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे **दिनांक १५/०४/२०२० पासून दि. ३०/०४/२०२० पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या सर्व लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

तसेच या कालावधीत विद्यापीठाद्वारे होणारे उत्तर पत्रिकांचे मूल्यांकन व प्रश्नपत्रिकांचे नियमन (मॉडरेशन) होणार नाही. त्याचप्रमाणे दिनांक ३०/०४/२०२० पासून पुढे घेण्यात येणाऱ्या सर्व लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेबाबत शासनाद्वारे निर्गमित होणारे निर्देश पुढे लागू राहतील, याची सुध्दा सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला
13/04/2020
(डॉ. प्रफुल्ल साबळे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन विभाग

प्रतिलिपी:
परीक्षा व मूल्यमापन विभागाचे सर्व अधिकारी.